• वर्ष : ०३ • अंक : २५० • पुणे • सोमवार, दि. ०१ जून २०२६ • मराठी दैनिक • पाने ४ • किंमत : २ रूपये • RNI No.-MAHMAR/2023/89313

SPECIAL OFFERS
ई-पेपर वेबसाईट बनवा
फक्त २९९९/-
SAVE UP TO 90%
NEWS
9359421909
ONLY THIS WEEK!
ORDER NOW
www.abhibee.com

दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील लोकप्रिय दैनिक

दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
CELEBRATING EXCELLENCE
HONORING IMPACT
On the occasion of the anniversary of
Daily Aarambh Parv
GRAND
AARAMBH PARV
STATE-LEVEL GAURAV AWARD CEREMONY
2026
Distinguished personalities who have made remarkable contributions in various fields such as Social Service, Journalism, Education, Art, Literature, Industry, Healthcare, Agriculture, Youth Empowerment and Women Empowerment will be honored at this event.
VENUE : To be announced soon
DATE : SEPTEMBER 2026
AARAMBH PARV GAURAV AWARDS 2026
HONORING EXCELLENCE ACROSS DIVERSE FIELDS
SOCIAL SERVICE | JOURNALISM | EDUCATION | ART & LITERATURE | INDUSTRY | YOUTH EMPOWERMENT | HEALTHCARE | AGRICULTURE | WOMEN EMPOWERMENT
ORGANIZED BY
DAILY AARAMBH PARV FAMILY
FOR NOMINATIONS & MORE INFORMATION
Mr. Laxman Sable, Pune 8605284272
Mr. Pratik Gangane, Pune 7276314142
Mr. Abhishek Margale 9359421909
Aarambh of those deeds... that create a new history!

सुवर्णसंधी!
InDesign ऑपरेटरची गरज आहे!
मासिक पगार
आकर्षक पगार दिला जाईल
घरून काम (Work From Home)!
अनुभवी आणि कल्पक ऑपरेटर हवा
मासिक पगार (पात्रतेनुसार)
इन-डिझाइन सॉफ्टवेअरचे उत्तम ज्ञान
कामाचे लवचिक तास
संपर्क : ७२७६३१४१४२/८६६७८६५७०२

आपला स्वत:चा
न्यूज पोर्टल वेबसाईट बनून मिळेल
फक्त ₹5000/- मध्ये
आपली बातमी | आपला आवाज | आपले व्यासपीठ
- मोबाईल फ्रेंडली डिझाइन
- बातम्या प्रकाशित करण्याची सोय
- कॅटेगरी, टॅग, सर्च आणि आर्काईव्ह सुविधा
- जाहिरात (Advertisement) स्लॉट
- सोशल मीडिया शोअरिंग सुविधा
- SEO फ्रेंडली आणि फास्ट वेबसाइट
- 1 वर्ष फ्री टेक्निकल सपोर्ट
आजच संपर्क करा 9359421909
Abhibee.com
आपली ओळख... जगभर!

दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
पुणे प्रहार NEWS CHANNEL
दैनिक आरंभ पर्व व पुणे प्रहार चॅनलसाठी
संपूर्ण महाराष्ट्रात पत्रकार नेमणे आहे!
आपणही बना आमच्या टीमचा भाग !
महाराष्ट्राच्या प्रत्येक तालुका, जिल्हा आणि शहरातून प्रतिनिधी हवे आहेत.
आम्हाला हवे आहेत :
पात्रता : मराठी भाषा उत्तम लिहिता-बोलता येणे आवश्यक. पत्रकारितेचा अनुभव असणे प्राधान्य.
कामाचे स्वरूप : बातम्या संकलन, लेखन, रिपोर्टिंग, फोटो/व्हिडिओ कव्हरेज, स्थानिक घडामोडींचे वृत्तांकन.
आम्ही देतो : ओळखपत्र, व्यासपीठ, मार्गदर्शन आणि योग्य मानधन.
कार्य क्षेत्र : संपूर्ण महाराष्ट्र (जिल्हा, तालुका, शहर व ग्रामीण भाग)
आमच्याशी जोडल्याने मिळेल :
विश्वसनीय वृत्तांकन | व्यापक वाचकवर्ग | नि:पक्ष व सकारात्मक पत्रकारिता | प्रत्यक्ष घडामोडींवर अचूक नजर
बातमी आहे... तर आमच्यापर्यंत पोहोचवा! समाजाचा आवाज बना!
आपली ओळख करा... आपला आवाज बुलंद करा!
संपर्क : 7276314142
आजच संपर्क साधा आणि आमच्या टीममध्ये सहभागी व्हा!

## थोडक्यात पण महत्वाचे



### ऐतिहासिक "सुवर्णद्वीप" पुस्तकाचे ६ जून रोजी होणार प्रकाशन

पुणे (आरंभ पर्व) : प्राचीन भारत आणि इंडोनेशिया यांच्यातील सांस्कृतिक व ऐतिहासिक संबंध उलगडणाऱ्या "सुवर्णद्वीप - हिंदू बुद्धिस्ट किंगडम्स ऑफ एन्शंट इंडोनेशिया" या पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्याचे आयोजन ६ जून रोजी करण्यात आले आहे. अशी माहिती पुस्तकाच्या लेखिका ऋता उंबरजे आणि संगीता चाफेकर यांनी पत्रकार परिषदेत दिली. कार्यक्रमाबद्दल अधिक माहिती देताना त्यांनी सांगितले की "सुवर्णद्वीप - हिंदू बुद्धिस्ट किंगडम्स ऑफ एन्शंट इंडोनेशिया" या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा ६ जून २०२६ रोजी सायंकाळी ६.१५ वाजता फिरोदिया ऑडिटोरियम, भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्था येथे होणार आहे. यावेळी माजी आयसीएचआर अध्यक्ष डॉ. ए. पी. जामखेडकर यांच्या हस्ते पुस्तकाचे प्रकाशन करण्यात येणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. जी. बी. देगलूरकर हे राहणार असून, डॉ. अंबरीश खरे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.




### 'क्रिकेट रत्न पुरस्कार २०२६' वितरण सोहळा उत्साहात संपन्न


पुणे (आरंभ पर्व) : इंडिया अगेन्स्ट करप्शनतर्फे आयोजित करण्यात आलेला 'क्रिकेट रत्न पुरस्कार २०२६'चे वितरण आज पुणे श्रमिक पत्रकार संघ येथे उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले. क्रिकेट क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या खेळाडूंचा यावेळी सन्मान करून त्यांना कौतुकाची थाप देण्यात आली. या कार्यक्रमाचे नेतृत्व इंडिया अगेन्स्ट करप्शनचे राष्ट्रीय अध्यक्ष हेमंत पाटील यांनी केले. कार्यक्रमास प्रमुख मान्यवर म्हणून माजी रणजी क्रिकेट पटू, महाराष्ट्र राज्य हेमंत किणीकर आणि राष्ट्रीय क्रिकेट खेळाडू अनुजा पाटील उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पाच खेळाडूंना यंदाचा 'क्रिकेट रत्न पुरस्कार २०२६' प्रदान करण्यात आला. यामध्ये आय.पी.एल. खेळाडू पुनम खेमनर, आय पी एल खेळाडू किरण नवगीरे, आय.पी. एल खेळाडू गौतमी नाईक, महाराष्ट्र राज्य खेळाडू भक्ती मिरजकर आणि महाराष्ट्र राज्य खेळाडू आक्षया जाधव या पुरस्काराच्या मानकरी होत्या. कार्यक्रमादरम्यान उपस्थित मान्यवरांनी महिला क्रिकेटपटूंच्या वाढत्या यशाबद्दल समाधान व्यक्त करत त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. क्रिकेट क्षेत्रात सातत्यपूर्ण मेहनत आणि जिद्दीच्या जोरावर यश मिळवणाऱ्या खेळाडूंना अशा पुरस्कारांमुळे अधिक प्रेरणा मिळते, असे मत यावेळी आयोजक हेमंत पाटील यांनी व्यक्त केले. या प्रेरणादायी सोहळ्याचे सूत्रसंचालन प्रियंका कुंभार यांनी प्रभावीपणे केले. कार्यक्रमास विविध क्षेत्रातील मान्यवर, क्रीडाप्रेमी आणि पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### ४० हून अधिक चित्रपटांच्या भव्य प्रीमियर मॅरेथॉनची सुरूवात




मुंबई (आरंभ पर्व) : अब नजर नहीं हटेगी झी सिनेमा से, क्यूंकि यहां प्रीमियर्स होंगे आऊट ऑफ कंट्रोल! या उन्हाळ्याला ब्लॉकबस्टर उत्सवात बदलत झी सिनेमा वाहिनी 40 हून अधिक चित्रपटांच्या प्रीमियरची भव्य श्रृंखला घेऊन येत आहे. यात प्रेक्षकांना ॲक्शनचा जबरदस्त धमाका, रोमहर्षक कथा आणि अखंड ब्लॉकबस्टर मनोरंजनाचा अनुभव मिळणार आहे. एकामागोमाग एक नव्या प्रीमियर्ससह प्रेक्षकांना नॉन-स्टॉप मनोरंजनाची सफर पहिल्यापेक्षाही अधिक जोमाने अनुभवता येणार आहे. प्रीमियर्सच्या या मालिकेची सुरुवात 'अखंडा 2' या चित्रपटाने होणार असून त्याचा प्रीमियर सोमवार, 1 जून रोजी रात्री 8 वाजता होईल. नंदामुरी बालकृष्ण यांची प्रमुख भूमिका आणि बोयापती श्रीनु यांच्या दिग्दर्शनाखाली तयार झालेला हा चित्रपट श्रद्धा आणि अध्यात्मावर आधारित असून, वाढत्या अंधाराविरुद्ध धर्माचे रक्षण करणाऱ्या दैवी शक्तीभोवती ही कथा फिरते. अभिनेता - दिग्दर्शक या ब्लॉकबस्टर जोडीला पुन्हा एकदा एकत्र आणत भक्ती, न्याय आणि भव्य ॲक्शन यांचा जबरदस्त संगम साधत हा चित्रपट कथेला अधिक प्रभावी बनवतो. यात पाहायला मिळतो. 'अखंडा 2' मध्ये लढाई केवळ भौतिक पातळीवर मर्यादित न राहता धर्माच्या संतुलनाला आव्हान देणाऱ्या अदृश्य शक्तींचाही सामना करते. सनातन धर्म आणि दैवी ऊर्जेचा प्रभाव असलेला हा चित्रपट प्रेक्षकांना एक वेगळ्याच आध्यात्मिक पातळीवरील दमदार सिनेमॅटिक अनुभव देतो.

### भारतीयांच्या औषधांच्या खर्चात १२८ कोटी रुपयांहून अधिक बचत केली




मुंबई (आरंभ पर्व) : परवडणाऱ्या ब्रँडेड-जेनेरिक औषधे उपलब्ध करून देणाऱ्या भारतातील सर्वात विश्वासार्ह प्लॅटफॉर्म असलेल्या प्लॅटिनमआरएक्सने मोठा टप्पा गाठला असून देशभरातील 10 लाखांहून अधिक रुग्णांना आपली सेवा दिली आहे. दर्जेदार जेनेरिक पर्याय उपलब्ध करून देत कंपनीने ग्राहकांच्या औषध खर्चात एकूण 128 कोटी रुपयांपेक्षा जास्त बचत केली आहे. मधुमेह, उच्च रक्तदाब आणि हृदयविकारासारख्या आजारांमुळे लाखो भारतीयांना दरमहा 2,000 ते 5,000 रुपयांपर्यंत औषधांवर खर्च करावा लागतो. या वाढत्या खर्चामुळे 70 कोटींहून अधिक लोक औषधांचे डोस चुकवतात, औषधे पुन्हा घेण्यास उशीर करतात किंवा उपचार अर्धवट सोडतात. ही परिस्थिती बदलण्यासाठी प्लॅटिनमआरएक्सची सुरुवात करण्यात आली. हा प्लॅटफॉर्म प्रत्येक औषधासाठी एक काळजीपूर्वक निवडलेला आणि उच्च दर्जाचा ब्रँडेड जेनेरिक पर्याय उपलब्ध करून देतो. ही औषधे नामांकित फार्मा कंपन्यांकडून थेट घेतली जातात आणि त्यामध्ये मूळ ब्रँडेड औषधांप्रमाणेच 100 टक्के समान सॉल्ट कॉम्पोझिशन असते.

# दारूच्या नशेत नऱ्हे पोलिस चौकीत महिलेचा गोंधळ

## शासकीय कामात अडथळा, गुन्हा दाखल

**धायरी (दै. आरंभ पर्व)**

नऱ्हे पोलिस चौकीत दारूच्या नशेत येऊन पोलिस कर्मचाऱ्यांशी अरेरावी, शिवीगाळ करत शासकीय कामकाजात अडथळा निर्माण केल्याप्रकरणी एका महिलेविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शितल गोरे (वय ४१, रा. मानाजीनगर, नऱ्हे) असे संबंधित महिलेचे नाव असून याप्रकरणी नऱ्हे पोलिस चौकीच्या पोलिस उपनिरीक्षक नम्रता सोनवणे यांनी फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संबंधित महिला तिच्या तक्रारीच्या संदर्भात नऱ्हे पोलिस चौकीत आली होती. यापूर्वी तिच्या सांगण्यावरून समोरील व्यक्तीविरुद्ध अदखलपात्र गुन्हा नोंद करण्यात आला होता. मात्र, गुन्हा दाखल का करण्यात आला नाही, यावरून ती संतप्त झाली. त्यानंतर तिने चौकीतच मोठ्याने आरडाओरडा करण्यास सुरुवात केली. पोलिस कर्मचाऱ्यांशी अरेरावीची भाषा वापरत शिवीगाळ केली तसेच चौकीतील वातावरण तणावपूर्ण बनविले.

संबंधित महिलेला पोलिसांनी वारंवार समजावून सांगितले. तसेच चौकीबाहेर जाण्याची विनंतीही केली. मात्र, ती ऐकत नसल्याने चौकीतील शासकीय कामकाजात अडथळा निर्माण झाला. त्या वेळी विविध तक्रारींसाठी आलेले नागरिक, महिला व ज्येष्ठ नागरिक यांनाही गैरसोयीचा सामना करावा लागला. काही काळ चौकीतील नियमित कामकाज विस्कळीत झाले होते.

महिलेचा आक्रमकपणा वाढत असल्याचे लक्षात आल्यानंतर महिला पोलिस कर्मचाऱ्यांची मदत घेण्यात आली. चौकी परिसरात नागरिकांची गर्दी जमू लागल्याने परिस्थिती अधिक तणावपूर्ण बनली होती. मात्र, पोलिसांनी संयम राखत परिस्थिती नियंत्रणात आणली व संबंधित महिलेला ताब्यात घेतले.

यानंतर तिला वैद्यकीय तपासणीसाठी ससून रुग्णालयात पाठविण्यात आले. डॉक्टरांनी केलेल्या तपासणीत ती मद्यधुंद अवस्थेत असल्याचे निष्पन्न झाले. वैद्यकीय अहवाल प्राप्त झाल्यानंतर पोलिसांनी शासकीय




कामात अडथळा आणणे, सार्वजनिक ठिकाणी गोंधळ घालणे तसेच पोलिस कर्मचाऱ्यांना कर्तव्य बजावण्यापासून रोखणे आदी कलमान्वये तिच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला.

पोलिस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, संबंधित महिला यापूर्वीही विविध कारणांवरून पोलिस ठाण्यांमध्ये जाऊन वाद घालत असल्याच्या तक्रारी आहेत. मागील वर्षी बाणेर पोलिस ठाण्यातही तिने दारूच्या नशेत अशाच प्रकारे गोंधळ घातल्याची माहिती पोलिसांकडून मिळाली आहे. तिच्याविरोधात यापूर्वीही काही तक्रारी प्राप्त झाल्याची चर्चा परिसरात सुरू आहे.

दरम्यान, चौकीतील संपूर्ण प्रकार सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला असून त्याची नोंद तपासासाठी घेण्यात आली आहे. नऱ्हे पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक आसाराम शेटे तसेच पोलिस निरीक्षक (गुन्हे) ईश्वर चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई करण्यात आली असून पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक अमोल मालुसरे करीत आहेत. पोलिस ठाणे अथवा पोलिस चौकी परिसरात मद्यधुंद अवस्थेत येऊन गोंधळ घालणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा पोलिस प्रशासनाने दिला आहे. तसेच नागरिकांनी कोणतीही तक्रार अथवा वादविवाद कायदेशीर मार्गाने सोडवावेत आणि कायदा हातात घेऊ नये, असे आवाहनही करण्यात आले आहे. दरम्यान, या घटनेची नऱ्हे परिसरात दिवसभर चर्चा सुरू होती.

# स्वातंत्र्यवीर सावरकरांना अभिवादन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

स्वातंत्र्यवीर सावरकर फाउंडेशन आणि विश्व हिंदू जागृती फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने पुण्यातील सारसबाग येथे स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम उत्साहात पार पडला. यावेळी स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमास प्रखर हिंदुत्ववादी मिलिंद एकबोटे आणि सीए सर्वेश मेहेंदळे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच स्वातंत्र्यवीर सावरकर



**'भारतरत्न' देण्यासाठी पाठपुरावा करणार**

फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रितम थोरवे, सचिव नयन ठाकूर, विश्वस्त ॲड. श्रीराम जोशी, अमरनाथ देवळालीकर, आर्य नयन ठाकूर, विश्व हिंदू जागृती फाउंडेशनच्या विश्वस्त मुक्तीका वाटखेडकर यांच्यासह मोठ्या संख्येने सावरकरप्रेमी, हिंदुत्ववादी कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या राष्ट्रभक्ती, हिंदुत्व विचारधारा आणि सामाजिक कार्याचा गौरवपूर्ण उल्लेख केला. तरुण पिढीने सावरकरांचे विचार आत्मसात करून राष्ट्रहितासाठी कार्य करावे, असे आवाहनही यावेळी करण्यात आले.

## अक्षय यादव यांना 'स्टार महाराष्ट्र गौरव पुरस्कार' जाहीर

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

समाजसेवा, कर्तव्यनिष्ठा आणि क्रीडा क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल मुंबई पोलीस दलातील कॉन्स्टेबल तथा यशस्वी मॅरेथॉनपटू अक्षय अधिक यादव यांची 'स्टार महाराष्ट्र गौरव पुरस्कार २०२६' साठी निवड करण्यात आली आहे.

अवघ्या २९ व्या वर्षी अक्षय यादव हे मुंबई पोलीस दलात कॉन्स्टेबल म्हणून कार्यरत असून त्यांची नियुक्ती वरळी पोलीस मुख्यालय येथे आहे. पोलीस सेवेत असताना त्यांनी आपल्या कर्तव्याचे प्रामाणिकपणे पालन करत नागरिकांच्या सुरक्षेसाठी




उल्लेखनीय कार्य केले आहे.

कर्तव्य बजावत असतानाच त्यांनी क्रीडा क्षेत्रातही आपला ठसा उमटवला आहे. मॅरेथॉन धावपटू म्हणून विविध स्पर्धांमध्ये सहभाग नोंदवत त्यांनी उत्कृष्ट कामगिरी केली असून अनेक युवकांसाठी ते प्रेरणास्थान ठरले आहेत. त्यांची जिद्द, शिस्त, मेहनत आणि समाजाप्रती असलेली बांधिलकी विशेष उल्लेखनीय मानली जाते.

सार्वजनिक सेवेमधील योगदान तसेच क्रीडा क्षेत्रातील उल्लेखनीय यशाची दखल घेत त्यांना 'स्टार महाराष्ट्र गौरव पुरस्कार २०२६' प्रदान करून सन्मानित करण्यात येणार आहे.

या यशाबद्दल अक्षय अधिक यादव यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत असून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छांचा वर्षाव केला जात आहे.

# आकाश एज्युकेशनलचे विद्यार्थी स्पर्धेत चमकले

## प्रतिष्ठित विज्ञान प्रतिभा स्पर्धेत विद्यार्थ्यांनी रौप्य आणि कांस्य पदके पटकावली

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

परीक्षा तयारी सेवांमधील राष्ट्रीय स्तरावरील अग्रणी असलेल्या आकाश एज्युकेशनल सर्व्हिसेस लिमिटेडने (AESL), ग्रेटर बॉम्बे सायन्स टीचर्स असोसिएशन (GBSTA) द्वारे आयोजित प्रतिष्ठित डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धा (DHBBVC) 2025-26 मध्ये आपल्या विद्यार्थ्यांच्या उत्कृष्ट कामगिरीची अभिमानाने घोषणा केली. महाराष्ट्र (यूएस)/ होमी भाभा शैक्षणिक विज्ञान स्पर्धेच्या निकालांच्या आधारे, पुणे आणि कोथरूड येथील आकाश केंद्रांकडून मिळणाऱ्या सन्मानांमुळे उद्याची वैज्ञानिक दृष्टी घडवण्याची गौरवशाली परंपरा कायम आहे. ही स्पर्धा महाराष्ट्रातील माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी विज्ञान क्षेत्रातील प्रतिभा ओळखणाऱ्या प्रमुख स्पर्धांपैकी एक आहे. दरवर्षी, डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धा चार कठोर टप्प्यांमधून विद्यार्थ्यांची




ओळख करून त्यांना सन्मानित करते. सैद्धांतिक परीक्षा, प्रात्यक्षिक मूल्यांकन, मुलाखती आणि प्रकल्प. या टप्प्यांमुळे विज्ञानाची आवड असलेल्या तरुण प्रतिभेला विविध मार्गांनी स्वतःला सिद्ध करण्याची संधी मिळते.यावर्षी, आकाश कोथरूड येथील नववी इयत्तेतील विद्यार्थी सूर्यांशू जावळे याला स्पर्धेच्या परीक्षण निकषांमधील उत्कृष्टतेसाठी रौप्य पदक प्रदान करण्यात आले, तर पुणे पीसीएमसीमध्ये शिकत असलेल्या अथर्व सूर्यवंशी या नववीच्याच विद्यार्थ्याने कांस्य पदक पटकावले. या दोन्ही यशांमधून विज्ञानाच्या तांत्रिक क्षेत्रात शैक्षणिक बांधिलकीची उच्च पातळी आणि व्यावहारिक उपयोगाद्वारे मिळवलेले यश दिसून येते. विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल त्यांचे अभिनंदन करताना, आकाश एज्युकेशनल सर्व्हिसेस लिमिटेड (AESL) चे मुख्य शैक्षणिक आणि व्यवसाय प्रमुख (पश्चिम), डॉ. एच. आर. राव म्हणाले, "सूर्यांशू आणि अथर्व यांचे यश त्यांचे समर्पण, कठोर परिश्रम आणि विज्ञानावरील प्रेम दर्शवते. डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धेसारख्या विज्ञान स्पर्धा लहान मुलांना नवीन कल्पना आणि मूल्यांकनाच्या पद्धती शोधण्यासाठी प्रोत्साहित करून विज्ञानातील सर्जनशीलता आणि चिकित्सक विचार कौशल्ये विकसित करतात. आकाश विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी तसेच त्यांची सर्जनशीलता विकसित करण्यासाठी आवश्यक साधनांसह एक पोषक वातावरण प्रदान करते." डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धा इयत्ता सहावी आणि नववीमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करते, आणि ही स्पर्धा इंग्रजी व मराठी या दोन्ही माध्यमांमध्ये घेतली जाते. यामध्ये चार टप्पे आहेत - सैद्धांतिक स्पर्धा, प्रात्यक्षिक स्पर्धा, सर्वसाधारण मुलाखत, आणि कृती संशोधन प्रकल्पावर आधारित मूल्यमापन व मुलाखत. या स्पर्धेचा उद्देश वैज्ञानिक तत्त्वांचे आकलन, तर्क, सहसंबंध आणि उपयोजन यांना प्रोत्साहन देणे हा आहे. यातील प्रश्न प्रामुख्याने महाराष्ट्र राज्य बोर्डाच्या विज्ञान पाठ्यपुस्तकांमधून, तसेच ICSE, IB आणि CBSE च्या विज्ञान पाठ्यपुस्तकांमधील आशयातून घेतले जातात.

## इंडियन ऑइलकडून पेट्रोल, डिझेल आणि एलपीजीचा अखंड पुरवठा

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

देशातील विविध भागांमध्ये इंधनाच्या मागणीत लक्षणीय वाढ होत असतानाही इंडियन ऑइल कॉर्पोरेशन लिमिटेड (आयओसी) पेट्रोल, डिझेल आणि एलपीजीचा सुरळीत व अखंड पुरवठा सुनिश्चित करत असल्याची माहिती कंपनीने दिली आहे. वाढलेल्या मागणीच्या पार्श्वभूमीवर कंपनीने आपल्या पुरवठा साखळी, वाहतूक व्यवस्था आणि वितरण यंत्रणा अधिक सक्षम करत देशभरात इंधन उपलब्धता कायम ठेवली आहे. आयओसीच्या आकडेवारीनुसार, महाराष्ट्रात 1 ते 28 मे 2026 या कालावधीत डिझेलच्या विक्रीत मागील वर्षाच्या तुलनेत तब्बल 31.5 टक्क्यांची वाढ नोंदविण्यात आली आहे. राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये विक्रीत मोठी वाढ झाली असून बीडमध्ये 67.3 टक्के, अहमदनगरमध्ये 61.2 टक्के, सांगलीमध्ये 53 टक्के, उस्मानाबादमध्ये 52.7 टक्के, अकोला आणि नांदेडमध्ये प्रत्येकी 51.6 टक्के




- नागरिकांना घाबरून अतिरिक्त खरेदी न करण्याचे आवाहन

वाढ झाली आहे. पुणे जिल्ह्यातही डिझेल विक्रीत 20.1 टक्क्यांची वाढ नोंदविण्यात आली आहे. कंपनीच्या मते, ग्रामीण भागातील हंगामी नांगरणी, कापणी आणि कृषी कामांमुळे इंधनाची मागणी वाढली आहे. तसेच सार्वजनिक क्षेत्रातील इंधन विक्रेत्यांच्या तुलनेत इतर पुरवठादारांच्या किंमतींमधील फरकामुळे ग्राहकांचा कल आयओसीच्या इंधन केंद्रांकडे वाढला आहे. याशिवाय, अनेक संस्थात्मक आणि व्यावसायिक ग्राहकांनी रिटेल इंधन केंद्रांकडे वळल्याने अतिरिक्त मागणी निर्माण झाली आहे.

## पाण्याच्या डागांना आता पूर्णविराम!

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

आजच्या घरमालकांना केवळ सुंदरच दिसणारी नाहीत तर आरामदायकही वाटणारी आणि वर्षानुवर्षे टिकणारी घरे आवडतात. परंतु, किफायती पेंट प्रकारांत, दिसण्यास आकर्षक, उत्तम कामगिरी आणि परवडणारी किंमत या तिन्ही गोष्टी एकत्र देणारी उत्पादने शोधणे मात्र अनेकदा कठीण असते. सर्वसामान्य चिंतांपैकी एक म्हणजे भिंतींवरील पाण्याचे डाग, ही एक अशी समस्या आहे जी अन्यथा चांगल्या प्रकारे जोपासलेल्या घराचे सौंदर्य नकळतपणे कमी करू शकते. ही गरज लक्षात घेऊन, एशियन पेंट्सने आपल्या लोकप्रिय एस आणि ट्रॅक्टर इमल्शन्समध्ये अँटी-डॅम्प म्हणजेच आर्द्रता विरोधी तंत्रज्ञान सादर केले आहे. याबरोबरच, ही उत्पादने कामगिरीच्या महत्त्वाच्या पैलूंवर 4 वर्षांची वॉरंटी देतात, ज्यामुळे दीर्घकाळ टिकणारी कामगिरी आणि मूल्य एकाच उत्पादनात जुळून मिळतात. एशियन पेंट्सचे दोन सर्वात विश्वासार्ह आणि मोठ्या प्रमाणावर वापरले जाणारे ब्रँड्स, एस (Ace) आणि ट्रॅक्टर (Tractor) इमल्शन्स, यांनी




- एशियन पेंट्सचे एस आणि ट्रॅक्टर इमल्शन अँटी-डँप तंत्रज्ञानासह सादर

किफायती प्रकारात विश्वसनीय दर्जा आणि मूल्य उपलब्ध करून घरमालक, डीलर्स आणि कंत्राटदारांचा विश्वास जिंकला आहे. ग्राहकांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी पोर्टफोलिओमध्ये नवनवीन शोध सातत्याने सादर करणे चालू आहे. यामध्ये अधिक चांगले मूल्य देणारी ट्रॅक्टर अॅन्ड एस स्पार्क (ACE Sparc) श्रेणी आणि घरांसाठी एक चमकदार फिनिश देणारी ट्रॅक्टर अॅन्ड एस शाइन (Ace Shine) श्रेणी समाविष्ट आहे.~ आर्द्रता-विरोधी तंत्रज्ञान (Anti-Damp Technology) सादर करत, एशियन पेंट्सने घरमालकांना भेडसावणाऱ्या सर्वात सामान्य आव्हानांपैकी एकावर तोडगा शोधून हा वारसा पुढे नेला आहे.


# संरक्षक भितींच्या कामास ग्रामस्थांचा विरोध

## पुनर्वसनाचे अपूर्ण काम पूर्ण करण्याची मागणी

**जुन्नर (दै. आरंभ पर्व)**

भूस्खलनाचा धोका असलेल्या तळमाचीवाडी-निमगिरी ता.जुन्नर येथे सुरू असलेल्या संरक्षक भिंतीच्या कामास ग्रामस्थांनी विरोध दर्शविला आहे.पेसा कायदा व ग्रामसभेच्या ठरावाला डावलून तळमाचीवाडीत संरक्षण भिंतीचे काम सुरू असल्याची माहिती ग्रामस्थ संजय साबळे ,रवींद्र साबळे,व्यंकटेश साबळे, सचिन साबळे यांनी दिली.

ग्रामस्थांच्या माहितीनुसार, सुमारे १२०० फुटांच्या प्रस्तावित संरक्षण भिंतीपैकी सध्या केवळ ९४ मीटरचे काम सुरू असून त्याचा लाभ फक्त १३ घरांना होणार आहे. उर्वरित ९० टक्के लोकवस्ती, शाळा आणि अंगणवाडी असलेल्या धोकादायक भागात कोणतीही संरक्षण भिंत उभारली जात नसल्याने हे काम ग्रामस्थांच्या जीविताच्या संरक्षणासाठी नसून अन्य उद्देशाने केले जात असल्याची शंका ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. सदरहू काम ग्रामस्थांच्या




संमतीशिवाय सुरू करण्यात आले आहे. ह्या कामाविरोधात ग्रामस्थांनी तीव्र संताप व्यक्त केला असून हे काम तात्काळ बंद करून पुनर्वसनाचे अपूर्ण काम पूर्ण करण्याची मागणी प्रशासनाकडे केली आहे.

ग्रामस्थांनी यासंदर्भात पेसा कायदा १९९६, महाराष्ट्र पेसा नियम २०१४ तसेच ग्रामसभेच्या ठरावाचे उल्लंघन झाल्याचा गंभीर आरोप केला आहे. ग्रामस्थांनी सांगितले की, तळमाचीवाडीतील पुनर्वसन प्रकल्प २००५ पासून अपूर्ण अवस्थेत आहे. शासनाने मंजूर केलेल्या ११० घरांपैकी अवघी काही घरेच पूर्ण झाली असून उर्वरित कुटुंबे आजही मूलभूत सुविधांपासून वंचित आहेत. अशा परिस्थितीत पुनर्वसनाचे काम प्राधान्याने पूर्ण करणे आवश्यक असताना संबंधित विभाग आणि ठेकेदारांनी ग्रामस्थांच्या विरोधात संरक्षण भिंतीचे काम सुरू केल्याचे सांगण्यात आले.या भिंतीसाठी ७.५ कोटी रक्कम असल्याने ठेकेदार यांच्या आर्थिक हितासाठी प्रशासनाची धडपड केली जात असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

सदर संरक्षण भिंतीचे काम इस्टीमेट, कायदेशीर प्रक्रिया आणि ग्रामसभेची परवानगी न घेता सुरू करण्यात आल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. तळमाचीवाडी ही आदिवासी बहुल वस्ती असल्यामुळे कोणतेही विकासकाम करण्यापूर्वी ग्रामसभेची पूर्वसंमती घेणे कायद्याने बंधनकारक आहे. मात्र, या कामासाठी ग्रामसभेची अधिकृत मंजुरी घेण्यात आलेली नसून ग्रामपंचायत निमगिरी अंतर्गत विशेष ग्रामसभेत एकमताने संरक्षण भिंतीचे काम रद्द करण्याचा ठराव मंजूर करण्यात आला होता. तरीदेखील प्रशासनाने त्याकडे दुर्लक्ष केल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. संरक्षण भिंतीसाठी करण्यात आलेल्या खोदकामामुळे गावातील एकमेव सार्वजनिक विहिरीचे नैसर्गिक जलस्रोत बाधित झाले असून भविष्यात तीव्र पाणीटंचाई निर्माण होण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे.

दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
सोमवार, दि. ०१ जून २०२६



OFFER... OFFER... OFFER
संपादक-पत्रकारांसाठी
धमाका ऑफर
युट्युब चॅनल साठी खास
शॉर्ट व्हिडिओ (रील्स) पॅकेज
➤ शॉर्ट व्हिडिओ हे दै. आरंभपर्व कडून बनवले जातील
➤ शॉर्ट व्हिडिओंमध्ये राजकीय बातम्या, व्हायरल व्हिडिओ असतील
➤ कालावधी – फक्त १ ते ३ मिनिटे
➤ चॅनल रिचनुसार ऑटोमॅटिक व्हायरल होणार
➤ VIEWS आणि SUBSCRIBE वाढवण्यास मदत
➤ शॉर्ट व्हिडिओंमधून पेमेंट कमाईची संधी
Shorts
फक्त : 8000 रुपये / महिना
(रोज ५ शॉर्ट व्हिडिओ – २६ दिवस)
मुख्य कार्यालय
दै. आरंभ पर्व कार्यालय, फ्लॅट नं. १६, चौथा मजला, सोमेश्वर अपार्टमेंट ए, धायरी फाटा, सिंहगड रोड, वडगाव बुद्रुक, शिंदे/अदाते हॉस्पिटल लेन, त्रिमूर्ती हॉस्पिटल समोर, पुणे – ४११०४१
7276314142
8657865702



## गोपाळवाडी ग्रामपंचायतमध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती साजरी

दौंड (आरंभ पर्व) : दौंड तालुक्यातील आदर्श व तंटामुक्त गाव अशी ओळख असलेल्या ग्रामपंचायत गोपाळवाडी कार्यालयामध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची 301 वी जयंती अति उत्साहांमध्ये साजरी करण्यात आली, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेसह इतर महापुरुषांच्या प्रतिमेला पुष्पहार पंचायत समितीच्या सदस्या सुमन ताई निकाळजे (गिरमे ) तसेच सरपंच स्वातीताई राजू पवार यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला, यावेळी सुमनताई निकाळजे व सरपंच स्वातीताई पवार यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याचा आढावा घेऊन जयंतीनिमित्त शुभेच्छा देण्यात आल्या यावेळी माजी सरपंच जयसिंग दादा दरेकर, गोपाळवाडी गावचे तंटामुक्त समितीचे अध्यक्ष राजेंद्र सोनवलकर, माजी चेअरमन भीमराव तात्या होले, शांताराम होले, माजी उपसरपंच सीमाताई बोरावके, सुरज भुजबळ, शरद होले, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अर्जुन गायकवाड, कल्पेश लांडगे आदीसह ग्रामस्थ यावेळी उपस्थित होते.



## वणव्यात होरपळलेल्या घराला ग्रामस्थांचा आधार; मदतीचे आवाहन

राजगुरूनगर (आरंभ पर्व) : कान्हेवाडी बुद्रुक (ता. खेड) येथे ढगमाऊली डोंगराला लागलेल्या वणव्यात एका घराला आग लागल्याने आदिवासी बांधवाचे घर जळून खाक झाले होते. दोन महिन्यांपूर्वी झालेल्या या घटनेत घरमालक गंगाराम खंडे यांचे संपूर्ण घर आगीच्या भक्ष्यस्थानी पडले होते. वणव्यातील या आगीत सुदैवाने जीवीतहाणी झाली नाही. परंतु घरातील धान्य, कपडे, कागदपत्रांसह सर्वच जळून खाक झाले होते. कुटुंबांची आर्थिक स्थितीही जेमतेम आहे. कागदपत्रांची अडचण निर्माण झाल्याने शासकीय मदत मिळण्यातही समस्या येत आहेत. त्यांच्या या संकटातून सावरण्यासाठी व पुन्हा घर उभारणीसाठी गावातील ग्रामस्थ, तालुक्यातील विविध सेवाभावी संस्था व संघटना तसेच वैयक्तिक पातळीवर मदत जमा होत आहे. घर बांधकामाच्या कामालाही प्रारंभ झाला आहे. तरीही आणखी मदतीची गरज आहे. त्यावेळी या कुटुंबाचा संसार पुन्हा उभा राहीलं, यासाठी नागरीकांना मदतीचे आवाहन कान्हेवाडी बुद्रुकच्या सरपंच उर्मिला दत्ता रुके यांनी केले आहे. मदतीसाठी तसेच इतर माहितीसाठी कान्हेवाडी बुद्रुक येथील सामाजीक कार्यकर्ते प्रा. मिलींद कोबल व दीप कोबल यांच्याशी (मोबा. ९९७५९९१५९८ ) संपर्क साधण्याचे आवाहन सरपंच रुके यांनी केले आहे.




## आरक्षण उपवर्गीकरणाची तात्काळ अंमलबजावणी करा

पुणे (आरंभ पर्व) : अनुसूचित जातींमधील ५९ घटकांना न्याय्य पद्धतीने आरक्षणाचा लाभ मिळावा यासाठी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आरक्षण उपवर्गीकरणाच्या निर्णयाची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी, अशी मागणी पुणे शहर जिल्हा मातंग समाजाच्या वतीने आयोजित पत्रकार परिषदेत करण्यात आली. तसेच कोणत्याही समाजातील महापुरुषांविषयी अपमानास्पद वक्तव्य करणाऱ्यांवर प्रशासनाने कठोर कारवाई करावी, अशी मागणीही यावेळी करण्यात आली. या पत्रकार परिषदेला माजी मंत्री दिलीप कांबळे, सुभाष जगताप, आमदार अमित गोरखे, अविनाश बागवे, विष्णू कसबे, शंकर तडाखे, पुणे शहर जिल्हा मातंग समाजाचे सचिव दीपक कसबे यांच्यासह समाजाच्या कोअर कमिटीचे सदस्य विकास सातारकर, भास्कर नेटके, डॉ. संपत जाधव, सुनील खंडागळे, सचिन जोगदंड, शंकर शेंडगे, ॲड. महेश सकट, संजय केंजळे, दयानंद आढागळे, लक्ष्मण तांदळे आणि समाजातील अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी बोलताना आमदार अमित गोरखे यांनी सांगितले की, सर्वोच्च न्यायालयाने अनुसूचित जातींच्या आरक्षणाचे उपवर्गीकरण करण्यास मान्यता दिली असून त्यामुळे आरक्षणाचा लाभ सर्व घटकांपर्यंत अधिक समतोल आणि न्याय्य पद्धतीने पोहोचू शकतो. मात्र, शासनाकडून अद्याप या निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी झालेली नसल्याने समाजामध्ये नाराजी वाढत आहे. त्यामुळे शासनाने याबाबत तातडीने निर्णय घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

# हातभट्टीची दारू कायमस्वरूपी हद्दपार होणे गरजेचे : राज्यमंत्री रामदास आठवले

## अनुसूचित जाती उपवर्गीकरण 2027 च्या जनगणनेच्या आधारे झाले पाहिजे



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

केवळ राज्यातच नव्हे तर देशभरात सर्रास विक्री जाणारी हातभट्टीची दारू अत्यंत घातक असून ती कायमस्वरूपी हद्दपार करण्यासाठी पोलिसांनी कठोर पावले उचलावी, अशी सूचना केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी केली.

पुणे आणि पिंपरी चिंचवड या ठिकाणी रसायनयुक्त विषारी दारू घेतल्यामुळे तब्बल 22 जणांचा मृत्यू झाला आहे. आठवले यांनी काही मृतांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले. मुलांच्या कुटुंबीयांना राज्य सरकारकडून पाच लाख रुपये तर महापालिकेकडून एक लाख रुपये मदत देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे मृतांच्या वारसांना नोकरी मिळावी अशी कुटुंबीयांची मागणी असून त्यादृष्टीने महापालिका आयुक्त चर्चा केल्याचेही आठवले यांनी सांगितले. यानंतर पुण्यात आयोजित पत्रकार परिषदेत आठवले बोलत होते. यावेळी आरपीआयचे पुणे शहराध्यक्ष संजय सोनवणे, प्रदेश सचिव बाळासाहेब जानराव, उपमहापौर परशुराम वाडेकर, नगरसेवक निलेश आल्हट, महिपाल वाघमारे, शाम सदाफुले, मोहन जगताप, अशोक गायकवाड, सलीम सय्यद, बसवराज गायकवाड, उमेश कांबळे, संदीप धांडोरे, सोनू निकाळजे, हबीब सय्यद, सुनील गवळी आदी उपस्थित होते. मध्यपूर्वेतील युद्धजन्य परिस्थितीमुळे जगभरात आर्थिक संकट उभे राहिले आहे. देशात या संकटाची व्याप्ती कमी करण्यासाठी सरकारला नाईलाजाने इंधन दरात वाढ करावी लागली आहे. त्यामुळे सर्वच क्षेत्रात महागाई वाढली असून त्याची झळ सर्वसामान्य नागरिकांना पोहोचत आहे. मात्र, युद्ध समाप्ती दृष्टिक्षेपात असून त्यानंतर इंधनाचे दर निश्चितपणे कमी केले जातील. अर्थातच महागाईला आळा बसण्यास मदत होईल, अशी ग्वाही आठवले यांनी दिली. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे 'महागाई मॅन' असल्याचा लोकसभेतील विविरोधीपक्ष नेते राहुल गांधी यांचा आरोप पूर्णपणे बिनबुडाचा असल्याचा दावा आठवले यांनी केला. वास्तविक मोदी हे विकास मॅन आणि देशाची शान असल्याचे त्यांनी नमूद केले.

## आरक्षण उपवर्गीकरणाचा हट्ट मातंग नेत्यांनी सोडावा

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

"अनुसूचित जातीच्या (SC) आरक्षणातील उपवर्गीकरणामुळे दलित आणि वंचित घटकांमध्ये अंतर्गत वाद निर्माण होऊन समाजाचे अतोनात नुकसान होणार आहे. त्यामुळे मातंग समाजाच्या नेत्यांनी आरक्षणाच्या उपवर्गीकरणाचा आपला हट्ट तातडीने सोडून द्यावा," असे परखड आवाहन आरक्षण उपवर्गीकरण पुनर्विलोकन समितीचे संयोजक राहुल डंबाळे यांनी येथे केले आहे. पुण्यात आयोजित बैठकीत ते बोलत होते. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर आरक्षणाच्या उपवर्गीकरणाबाबत देशभरात विविध मतप्रवाह समोर येत आहेत. या पार्श्वभूमीवर राहुल डंबाळे यांनी आपली आणि समितीची सविस्तर भूमिका स्पष्ट केली. यावेळी बोलताना राहुल डंबाळे म्हणाले की, "आरक्षणाच्या उपवर्गीकरणासाठी सातत्याने 'क्रांतीगुरू लहुजी वस्ताद



- उपवर्गीकरणामुळे समाजाचे अतोनात नुकसानच होणार: राहुल डंबाळे
- 'लहुजी वस्ताद साळवे आयोग' पूर्णतः एकतर्फी आणि राजकीय हेतूने प्रेरित!

साळवे आयोगाचा' हवाला दिला जातो. परंतु, हा आयोग पूर्णतः एकतर्फी आणि राजकीय हेतूने प्रेरित होऊन, चुकीच्या माहितीच्या आधारे तयार करण्यात आला होता हे एव्हाना स्पष्ट झाले आहे. वस्तुस्थिती ही आहे की, गेल्या वीस वर्षांत देशातील किंवा राज्यातील कोणत्याही अधिकृत समितीने अथवा आयोगाने मातंग समाजाला 'अप्रगत' ठरवलेले नाही.

## आर्सेलरमित्तल निप्पॉन स्टील इंडियाची जागतिक कामगिरी

### एपीआय ५ एल एक्स-१०० समतुल्य अतिमजबूत वेल्डेड पाइप्स निर्मितीत पहिले स्थान

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

आर्सेलरमित्तल निप्पॉन स्टील इंडिया (एएम/एनएस इंडिया) ने जागतिक दर्जाच्या उत्पादन क्षमतेचे प्रदर्शन करत समुद्री अभियांत्रिकी प्रकल्पांमध्ये वापरल्या जाणाऱ्या सर्वाधिक मजबुतीच्या वेल्डेड पाइप्स (ईक्यू 70 ग्रेड) चे उत्पादन करणारी जगातील पहिली स्टील कंपनी बनण्याचा मान मिळवला आहे. या पाइप्सना अमेरिकन ब्युरो ऑफ शिपिंग ( एबीएस) कडून प्रमाणपत्रही प्राप्त झाले आहे. एबीएस ही अग्रगण्य सागरी वर्गीकरण संस्था असून ती मजबुतीच्या निकषांसह जागतिक मान्यताप्राप्त मानकांचे पालन होत असल्याची स्वतंत्र पडताळणी करते. ऑफशोअर अभियांत्रिकी क्षेत्रात नवा मानदंड प्रस्थापित करत आर्सेलरमित्तल निप्पॉन स्टील इंडियाच्या या उपक्रमामुळे 'आत्मनिर्भर



भारत' आणि 'विकसित भारत' अभियानांना मोठे बळ मिळत आहे. या माध्यमातून देशातच सर्वाधिक मजबुतीचे वेल्डेड पाइप्स उपलब्ध होणार असून, सध्या तेल व वायू प्लॅटफॉर्म, ऑफशोअर विंड स्ट्रक्चर्स आणि खोल समुद्रातील पाइपलाइनसारख्या महत्त्वाच्या प्रकल्पांसाठी युरोपमधून आयात केल्या जाणाऱ्या सीमलेस पाइप्सना पर्याय निर्माण होणार आहे. उच्च कार्यक्षमतेच्या या वेल्डेड पाइप्समुळे भारतातील ऑफशोअर आणि अभियांत्रिकी क्षेत्रातील ग्राहकांना पुरवठ्याची अधिक सुरक्षितता, कमी कालावधीत उपलब्धता आणि कमी खर्चाचा फायदा होणार असून, देशांतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर स्पर्धात्मकता वाढण्यास मदत होणार आहे. कंपनीच्या या नव्या प्रगतीमुळे स्टील उत्पादनातील नवोन्मेषासाठीची तिची बांधिलकी अधिक दृढ झाली आहे. यासाठी तिच्या मूळ कंपन्या आर्सेलरमित्तल आणि निप्पॉन स्टील यांचे मजबूत तांत्रिक कौशल्य, संशोधन-विकास क्षमता आणि जागतिक दर्जाच्या कार्यपद्धतींचा आधार लाभला आहे. 'स्मार्टर स्टील्स, ब्राइटर फ्युचर्स' या ब्रँड वचनाशी सुसंगत असलेला हा टप्पा आर्सेलरमित्तल निप्पॉन स्टील इंडियाची सक्षम आणि आत्मनिर्भर देशांतर्गत स्टील परिसंस्था उभारण्यात तसेच अत्यंत विशेष आणि कडक नियमन असलेल्या जागतिक अनुप्रयोगांच्या गरजा पूर्ण करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका अधोरेखित करतो. आर्सेलरमित्तल निप्पॉन स्टील इंडियाने देशातील आघाडीच्या तेल आणि वायू उत्पादक कंपनीला मोठ्या प्रमाणात वेल्डेड पाइप्सचा पुरवठा आधीच केला आहे. अमेरिकन पेट्रोलियम इन्स्टिट्यूट ( एपीआय) 5एल एक्स 100क्यू समतुल्य असलेला ईक्यू 70 ग्रेड हा उच्च मजबुतीचा आणि कमी मिश्रधातू असलेला स्टील ग्रेड असून, त्याची किमान यिल्ड स्ट्रेंथ 690 मेगापास्कल (एमपीए) आहे.

## ब्लेंडर्स प्राईड पॅकेज्ड ड्रिंक्स वॉटरने सादर केले आहे 'रिझर्व्हड एक्सपिरियन्सेस'

### बहु-संवेदी शोधाद्वारे चवीची नवीन व्याख्या

**जयपूर (दै. आरंभ पर्व)**

ब्लेंडर्स प्राईड पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटरने 'ब्लेंडर्स प्राईड रिझर्व्हड एक्सपिरियन्सेस'चे अनावरण केले आहे, जे सर्व इंद्रियांच्या माध्यमातून - चवीचा कसा अनुभव घेतला जातो - याची पुनर्रचना करण्यासाठी तयार केलेले एक नवीन सांस्कृतिक व्यासपीठ आहे. अशा वेळी जेव्हा ग्राहक अधिक अर्थपूर्ण आणि उच्च दर्जाच्या अनुभवांकडे आकर्षित होत आहेत – जे त्यांच्या स्वतःच्या विकसित होत असलेल्या आवडीनिवडी आणि निवडी प्रतिबिंबित करतात, 'ब्लेंडर्स प्राईड रिझर्व्हड एक्सपिरियन्सेस' चवीला अधिक अर्थपूर्ण रूपात बदलून या बदलाला प्रतिसाद देत आहे. 'रिझवर्व्हड इन एव्हरी सेन्स' या कल्पनेवर आधारित, हे




व्यासपीठ चवीला एका बहु-आयामी प्रवासाच्या रूपात सादर करते - असा प्रवास ज्याचा केवळ आस्वादच घेतला जात नाही, तर तो पाहिला, ऐकला, स्पर्श केला आणि अनुभवला जाऊ शकतो. शेफ कुणाल कपूर यांच्यासोबत तयार केलेल्या या अनुभवाने एका जिव्हाळ्याच्या आणि विशेष सादरीकरणाद्वारे ही संकल्पना प्रत्यक्षात आणली.

या संध्याकाळच्या केंद्रस्थानी एक लाईव्ह पाककला सादरीकरण होते, जिथे संगीत आणि ताल यांच्यासोबत चवीचा मेळ घालत टेक्श्चर, सुगंध आणि रिदम यांचे अखंड संवेदी एक्सप्रेशनमध्ये रुपांतर करण्यात आले. या अनुभवाचे वैशिष्ट्य म्हणजे चवीचे जिभेच्या पलीकडचे केलेले सादरीकरण — मंत्रमुग्ध करणाऱ्या जागांच्या एका मालिकेच्या माध्यमातून, जिथे गतिमान दृश्य वातावरण आणि सुगंधावर आधारित इंस्टॉलेशन्सपासून ते स्पर्शज्ञान शोध आणि तयार केलेल्या चवीच्या अनुभवापर्यंत, प्रत्येक ठिकाणी एका वेगळ्या दृष्टिकोनातून चवीची व्याख्या करण्यात आली होती.

एक विकसित होत असलेले सांस्कृतिक व्यासपीठ म्हणून संकल्पना केलेले, ब्लेंडर्स प्राईड रिझर्व्हड एक्सपिरियन्सेस गुडगाव आणि चंदीगडमधील अनुभवांनंतर जयपूरमध्ये पार पडले, ज्याचा पुढील मुक्काम कोलकाता येथे असेल, सोबतच प्रमुख बाजारपेठांमध्ये 10+ उपक्रम राबवले जातील — जे सखोल सहभाग वाढवण्यासाठी आणि ग्राहकांना चवीचा अधिक मंत्रमुग्ध करणारा अनुभव देण्यासाठी डिझाइन केलेले आहेत.

## इंद्रियाचे 'एक रागा' सादरीकरण

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

आदित्य बिर्ला ज्वेलरीच्या इंद्रिया या ब्रँडने भारताच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाला उजाळा देणाऱ्या 'एक रागा' या विशेष सांस्कृतिक सादरीकरणाचे अनावरण केले आहे. नृत्य, कारागिरी, वास्तुकला आणि प्रादेशिक परंपरांचा संगम साधणाऱ्या या उपक्रमातून भारताच्या विविधतेतील एकतेचा उत्सव साजरा करण्यात येत आहे. 'एक रागा' ही संकल्पना नृत्याच्या माध्यमातून कथानक उलगडणारी असून, प्रत्येक हावभाव आणि हालचालीतून सांस्कृतिक अभिव्यक्ती साकारली जाते. पुण्यातील सादरीकरणाला महाराष्ट्राच्या उत्सवप्रिय संस्कृतीची आणि 'लावणी'च्या




जोशपूर्ण व भावनाप्रधान शैलीची प्रेरणा मिळाली आहे. पुण्यातील फिनिक्स मार्केट सिटी येथे उभारण्यात आलेल्या या अनुभवात्मक सादरीकरणाची संकल्पना 'दीपस्तंभ' या प्रकाश, समृद्धी आणि शुभारंभाचे प्रतीक असलेल्या पारंपरिक घटकावर आधारित आहे. या ठिकाणी पारंपरिक महाराष्ट्रीयन सौंदर्यशास्त्र, संगीत, नृत्य आणि अलंकार यांचा सुरेख मेळ साधण्यात आला आहे.

# पुरुषांचा विद्वेष करणे म्हणजेच स्त्रीवाद नव्हे

### रमाई साहित्य संमेलनाचे अध्यक्षपदावरून विद्रोही कवयित्री रमणी सोनवणे यांचे प्रतिपादन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये मुजोर असलेल्या सत्ता आणि संस्कृतीने स्त्रीला विविध नात्यांच्या आणि परंपरांच्या चौकटीत अडकवून टाकले असले तरी देखील केवळ विद्वेष करणे म्हणजे स्त्रीवाद नाही, असे प्रतिपादन विद्रोही कवयित्री आणि पहिल्या रमाई साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष रमणी सोनवणे यांनी केले.



महामाता रमाबाई भीमराव आंबेडकर राष्ट्रीय स्मारक यांच्या वतीने रमाबाई आंबेडकर यांच्या स्मृतिदिनाच्या आणि राष्ट्रीय स्मारकाच्या आठव्या वर्धापन दिनानिमित्त प्रथमच आयोजित करण्यात माता रमाई साहित्य संमेलनाच्या उद्घाटन प्रसंगी संमेलनाध्यक्ष म्हणून रमणी सोनवणे बोलत होत्या.

संमेलनाच्या उद्घाटन प्रसंगी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष श्रीपाल सबनीस, रंगत संगत प्रतिष्ठानचे अध्यक्ष ॲड. प्रमोद आडकर, पुणे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त ज्ञानेश्वर मोळक, साहित्य आणि संस्कृती क्षेत्रामध्ये कार्य करणारे सचिन इटकर, माजी नगरसेविका लता राजगुरू, संमेलनाचे मुख्य आयोजक विठ्ठल गायकवाड, ॲड नितीन घोडके, प्रशांत खिस्ती आदी मान्यवर उपस्थित होते.

भारतीय संविधानाने आपली बौद्धिक भूक भागवण्याचे कार्य केले. त्याचप्रमाणे एक स्त्री म्हणून समाजात समानतेचे स्थान देण्याचे कार्य केले. संविधानाच्या अंमलबजावणीपूर्वी समाजामध्ये पुरुष सत्ता संस्कृती मजूर होती. स्त्रीला नात्यांच्या आणि जबाबदारीच्या चौकटीत गुरफटून टाकण्यात आले होते. मात्र, केवळ पुरुषांना विरोध करणे म्हणजेच स्त्रीवाद नसून स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने हक्क आणि जबाबदाऱ्या प्रधान करणे हे समाजाच्या दृष्टीने महत्त्वाचे असल्याचे रमणी सोनवणे यांनी यावेळी नमूद केले.

# राजेंद्र सोनवलकर यांचे कार्य कौतुकास्पद

## उपविभागीय पोलीस अधिकारी बापूराव दडस

**दौंड (दै. आरंभ पर्व)**

गोपाळवाडी गावचे महात्मा गांधी तंटामुक्त समितीचे अध्यक्ष राजेंद्र सोनवलकर हे अनेक वर्षांपासून पत्रकारी क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्य करीत आहेत तसेच गेल्या दोन वर्ष उपाध्यक्ष म्हणून तर गेल्या सहा महिन्यापासून गोपाळवाडी गावचे तंटामुक्त समितीचे अध्यक्ष म्हणून कार्य करीत आहेत यामुळे त्यांचे कार्य हे उल्लेखनीय व समाज हिताच्या असून त्यांच्या कार्याचा गुणगौरव रोटरी क्लब दौंड यांच्या वतीने उपविभागीय पोलीस अधिकारी बापूराव दडस यांच्या हस्ते




सन्मानपत्र व पुष्पगुच्छ देऊन करण्यात आला, यापूर्वी राजेंद्र सोनवलकर यांना आदर्श पत्रकार पुरस्कार राज्यस्तरीय, रक्तदाता पुरस्कार राज्यस्तरीय, सामाजिक कार्यकर्ता पुरस्कार राज्यस्तरीय, कोरोना योद्धा पुरस्कार, दैनिक संध्या च्या वतीने आदर्श व निर्भीड पत्रकार पुरस्कार, तसेच अनेक पुरस्कार त्यांना मिळालेले आहेत, ते गेल्या वीस वर्षापासून पत्रकारी क्षेत्रामध्ये निर्भीड पत्रकार म्हणून प्रसिद्ध आहेत, यावेळी रोटरी क्लब दौंड अध्यक्ष दीपक शासम, सेक्रेटरी प्रज्ञा राज्य उपाध्याय, दौंड बार असोसिएशनचे अध्यक्ष पोपट फुलारी, दौंड तालुका पोलीस पाटील संघटनेचे अध्यक्ष विलास येचकर, दौंड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक गोपाळ पवार, पत्रकार प्रफुल भंडारी, डॉ.राजेश दाते, दौंड तालुक्यातून आलेल्या पोलीस पाटील तसेच तंटामुक्त अध्यक्ष या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित होते मान्यवरांच्या हस्ते पोलीस पाटील व तंटामुक्त समितीचे अध्यक्ष यांचा गुणगौरव करण्यात आला, यावेळी कायदेविषयक मार्गदर्शन अनेक मान्यवरांनी केले.



# पुनावाला कुटुंबाचा सिरम कर्मचारी संघटनेतर्फे गौरव

**लोणी काळभोर (दै. आरंभ पर्व)**

समाजातील सर्व स्तरांतील गरजू नागरिकांना मदतीचा हात देत सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या पुनावाला कुटुंबाचा सिरम कंपनी, हडपसर येथील सिरम कर्मचारी संघटना आणि सर्व कामगारांच्या वतीने विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी कंपनीचे अध्यक्ष डॉ. सायरस पुनावाला, मुख्य कार्यकारी अधिकारी आदर पुनावाला आणि मास्टर सायरस पुनावाला यांनी हा सन्मान स्वीकारला.

या कार्यक्रमाला मनुष्यबळ विभागाचे प्रमुख संचालक महेंद्र इंगे, प्रवीण गरकल, कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष अजित भितांडे, उपाध्यक्ष अतुल कदम, सचिव अजित खैरे, खजिनदार सचिन गायकवाड तसेच सदस्य सचिन तुपे, प्रवीण घुले आणि गिरीश मोरे उपस्थित होते.

यावेळी सिरम कर्मचारी संघटना व सर्व कामगारांच्या वतीने पुनावाला कुटुंबाला हस्तनिर्मित चित्र, कंपनीचे बोधचिन्ह असलेली सोन्याची भेटवस्तू तसेच विलू पुनावाला स्मृती रुग्णालयासाठी सुमारे ११ लाख रुपयांचा धनादेश देऊन गौरविण्यात आले.

यावेळी बोलताना सिरम कर्मचारी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष सचिन गोपीनाथ तुपे यांनी सांगितले की, सिरम इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया ही कंपनी १२ जून २०२६ रोजी जवळपास ६० वर्षांचा प्रवास पूर्ण करत आहे. कंपनीतील सुमारे ११ हजारांहून अधिक कामगार आणि त्यांच्या कुटुंबांचे पालकत्व स्वीकारणाऱ्या पुनावाला कुटुंबाने सामाजिक क्षेत्रातही उल्लेखनीय कार्य केले आहे.

पर्यावरण संवर्धन, शिक्षण, क्रीडा, आरोग्य, जनजागृती तसेच गरजू घटकांच्या मदतीसाठी पुनावाला कुटुंब सातत्याने कार्यरत असल्याचे त्यांनी नमूद केले. 'आदर पुनावाला स्वच्छ शहर' उपक्रमाअंतर्गत पुणे शहर आणि परिसरातील स्वच्छता मोहिमेला मोठे बळ मिळाले असून ग्रामीण भागात स्वच्छ पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यासाठीही विविध योजना राबविल्या जात आहेत.

"पुनावाला कुटुंबामुळे कंपनीतील कामगारांच्या जीवनमानात आणि जीवनशैलीत मोठा सकारात्मक बदल झाला आहे. त्यामुळे सायरस पुनावाला, आदर पुनावाला आणि संपूर्ण पुनावाला कुटुंब हे सर्व कामगारांसाठी दैवतासमान आहेत," अशी भावना सचिन तुपे यांनी व्यक्त केली.

धनादेश स्वीकारताना वेल्फेअर मेडिकल फाउंडेशनचे अध्यक्ष व विश्वस्त डॉ. किरण शहा, व्यवस्थापकीय विश्वस्त डॉ. भूषण माणगावकर यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते. वेल्फेअर मेडिकल फाउंडेशनच्या वतीने कामगार व संघटना पदाधिकाऱ्यांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. यावेळी डॉ. भूषण माणगावकर यांनी सांगितले की, या आर्थिक योगदानामुळे विलू पुनावाला स्मृती रुग्णालयामार्फत गरजू रुग्णांना अधिक दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याच्या कार्याला बळ मिळणार आहे. कार्यक्रमाच्या शेवटी मनुष्यबळ विभागाचे प्रमुख संचालक महेंद्र इंगे यांनी कंपनीच्या वतीने कर्मचारी संघटनेचे पदाधिकारी आणि सर्व कामगारांचे आभार मानले.

# पॅन आयआयटी एल्युमनी इंडियाकडून 'परिणिती'चे सॉफ्ट लाँच

## भारताच्या एआय धोरणाला नवी दिशा

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

देशातील कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) क्षेत्रातील धोरणात्मक नेतृत्व मजबूत करण्याच्या उद्देशाने पॅन आयआयटी एल्युमनी इंडियाने (PIAI) आपल्या प्रमुख थिंक टँक 'पॅन आयआयटी एआय नीती (परिणिती)' चे सॉफ्ट लाँच केले. मुंबईतील बॉम्बे जिमखाना येथे आयोजित विशेष कार्यक्रमात आयआयटीचे ज्येष्ठ माजी विद्यार्थी, उद्योग क्षेत्रातील अग्रणी, स्टार्टअप संस्थापक आणि गुंतवणूक क्षेत्रातील प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. जगभरातील पाच लाखांहून अधिक आयआयटी पूर्वविद्यार्थ्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या पॅन आयआयटी एल्युमनी इंडियाने भारताच्या एआय अधिष्ठानासाठी एक मजबूत, विश्वासार्ह आणि स्वतंत्र विचारमंच उभारण्याच्या उद्देशाने या उपक्रमाची सुरुवात केली आहे. हा थिंक टँक सेमीकंडक्टर, ऊर्जा, क्लाउड इन्फ्रास्ट्रक्चर, डेटा सेंटर्स, अल्गोरिदम, गव्हर्नन्स आणि एआय अनुप्रयोगांसह संपूर्ण एआय व्हॅल्यू चेनचा अभ्यास करणार आहे.

यावेळी पॅन आयआयटी एल्युमनी इंडियाचे चेअरमन प्रभात कुमार म्हणाले, "पॅन आयआयटी एआय नीती (परिणिती) ही भारतातील कृत्रिम बुद्धिमत्तेच्या क्षेत्रात विचारनेतृत्व मजबूत करण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. या उपक्रमाद्वारे आयआयटी पूर्वविद्यार्थी, उद्योग नेते, संशोधक आणि धोरणनिर्माते यांना एकत्र आणून जबाबदार एआय विकास, नवोपक्रम आणि राष्ट्रनिर्मितीसाठी योगदान देण्याचा आमचा प्रयत्न आहे."



या थिंक टँकचे अध्यक्षपद पॅन आयआयटीचे विद्यमान चेअरमन भूषवणार असून, आयआयटी एल्युमनी समुदायातील विविध विषयतज्ज्ञ कोर सदस्य म्हणून काम पाहतील. पाच ते सहा स्वतंत्र व्हर्टिकल्सद्वारे हा उपक्रम राबविण्यात येणार असून प्रत्येक विभाग एआय अधिष्ठानाच्या महत्त्वाच्या घटकांवर लक्ष केंद्रित करेल. या उपक्रमासाठी सुमारे ५० ते ६० वरिष्ठ व्यावसायिकांची निवड केली जाणार आहे. यामध्ये सीईओ, सीएक्सओ, युनिकॉर्न स्टार्टअप संस्थापक, व्हेंचर कॅपिटल भागीदार, वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी आणि आघाडीचे शैक्षणिक तज्ज्ञ यांचा समावेश असेल. सदस्यांची निवड कठोर प्रोफाइल मूल्यांकन प्रक्रियेनंतर केली जाईल.

दरम्यान, आयआयटी एल्युमनी नेतृत्वाखालील अग्रगण्य भारतीय व्यवस्थापन सल्लागार संस्था Praxis Global Alliance यांची परिणितीसाठी थिंक टँक आणि नॉलेज पार्टनर म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. संशोधन, डेटा विश्लेषण, धोरणात्मक चर्चा, व्हाइट पेपर, पॉलिसी ब्रीफ आणि ओप-एड्स तयार करण्याची जबाबदारी प्रॅक्सिसकडे असेल. मात्र, या प्रक्रियेतून निर्माण होणाऱ्या सर्व बौद्धिक संपत्तीचे हक्क पॅन आयआयटीकडेच राहतील.

परिणिती अंतर्गत दरमहा लहान गटांच्या ऑनलाइन बैठका आयोजित केल्या जातील. या चर्चांमधून तयार होणाऱ्या निष्कर्षांचे संकलन करून सरकार, उद्योग क्षेत्र आणि समाजासाठी उपयुक्त धोरणात्मक शिफारसी तयार केल्या जाणार आहेत. यावेळी प्रभात कुमार यांनी सांगितले की, "पॅन आयआयटी नेहमीच प्रतिभा, धोरण आणि अंमलबजावणी यांच्यातील सेतू राहिले आहे. परिणिती हा वारसा पुढे नेत आयआयटी एल्युमनीची तज्ज्ञता प्रत्यक्ष धोरणात्मक परिणामांमध्ये रूपांतरित करेल आणि धोरणनिर्मात्यांना बाजारपेठेतील वास्तवाशी जोडेल." भारताच्या एआय भविष्याला दिशा देण्याच्या उद्देशाने सुरू झालेला हा उपक्रम देशातील तंत्रज्ञान, उद्योग आणि सार्वजनिक धोरण यांच्यातील समन्वय अधिक मजबूत करण्यासाठी महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.

# हार्डविन इंडिया लिमिटेडची आजपर्यंतच्या सर्वाधिक वार्षिक आकडेवारीची नोंद

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

हार्डविन इंडिया लिमिटेडने आज 31 मार्च 2026 रोजी संपलेल्या तिमाहीचे आणि पूर्ण वर्षाचे लेखापरीक्षित आर्थिक निकाल जाहीर केले. कंपनीने आर्थिक वर्ष 2025 मधील ₹18,537.39 लाख रुपयांच्या तुलनेत आर्थिक वर्ष 2026साठी ₹20,041.35 लाखांचे एकूण उत्पन्न नोंदवले, जे वर्ष-दर-वर्ष स्थिर वाढीचा मार्ग दर्शवते. संपूर्ण वर्षासाठी निव्वळ नफा ₹1,320.58 लाख इतका होता, जो मागील वर्षाच्या ₹1,123.12 लाखांपेक्षा जास्त होता, ज्यामुळे पीएटीमध्ये 17.58% वाढ झाली, ज्यामुळे नफा आणि ऑपरेटिंग लीव्हरेजमध्ये सातत्याने सुधारणा होत असल्याचे अधोरेखित होते. चौथी तिमाही आर्थिक वर्ष 2026 साठी, कंपनीने ₹5,747.42 लाखांचा महसूल आणि ₹ 342.94 लाखांचा निव्वळ नफा नोंदवला, ज्यामुळे नवीन आर्थिक वर्षात प्रवेश करण्याची जोरदार गती दिसून आली. आर्थिक वर्ष 2026 साठी प्रति समभाग (मूलभूत) कमाई आर्थिक वर्ष 2025 मधील ₹ 0.23 च्या तुलनेत ₹ 0.27 प्रति समभाग (दर्शनी मूल्य ₹1/-) वर आली. कंपनीने बोनस समभाग जारी करण्याचा विचारही केला आहे. कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक रुबलजीत सिंग सयाल म्हणाले "आर्थिक वर्ष 2026 हे उद्देशपूर्ण अंमलबजावणीचे वर्ष राहिले आहे.

# हरवलेल्या वृद्ध महिलेला केले नातेवाईकांच्या स्वाधीन

## दौंड पोलीस स्टेशनची सतर्कता

**दौंड (दै. आरंभ पर्व)**

दिनांक 30/05/2026 रोजी मध्यरात्री 12.00 वाजण्याच्या सुमारास दौंड पोलीस स्टेशनचे पोलीस अधिकारी व अंमलदार मौजे रावणगाव, ता. दौंड, जि. पुणे हद्दीत नियमित गस्त घालत असताना रस्त्याच्या कडेला एक वृद्ध महिला संशयास्पद अवस्थेत उभी असल्याचे निदर्शनास आले.



पोलीसांनी सदर महिलेची विचारपूस केली असता तिला स्वतःबाबत अथवा तिच्या नातेवाईकांबाबत कोणतीही स्पष्ट माहिती देता येत नव्हती. सदर महिलेच्या अंगावर अंदाजे 2 ते 2.5 तोळे सोन्याचे दागिने असल्याने तिच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने तसेच कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस निरीक्षक श्री. गोपाळ पवार, दौंड पोलीस स्टेशन यांनी तत्काळ गांभीर्याने दखल घेऊन सदर महिलेस दौंड पोलीस स्टेशन येथे आणण्याचे निर्देश दिले. त्यानंतर महिलेचे वर्णन, अंगावरील कपडे व इतर ओळख पटविणारी माहिती पुणे जिल्ह्यातील सर्व पोलीस यंत्रणांना वायरलेस संदेशाद्वारे तसेच विविध व्हॉट्सअॅप समूहांवर प्रसारित करण्यात आली. पोलीसांच्या या तत्पर प्रयत्नांमुळे आज दिनांक 30/05/2026 रोजी सदर महिलेचे नातेवाईक दौंड पोलीस स्टेशन येथे आले असता महिलेची ओळख पटली.

सदर महिलेचे नाव दाळाबाई दादू सावंत (वय 70 वर्षे), रा. वैदवाडी, हडपसर, पुणे असे असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर आवश्यक खातरजमा करून सदर महिलेस सुखरूपपणे तिचे नातेवाईक दिलीप प्रकाश सावंत यांच्या ताब्यात देण्यात आले.

दौंड पोलीस स्टेशनच्या अधिकारी व अंमलदारांनी दाखविलेल्या सतर्कता, संवेदनशीलता व तत्परतेमुळे एक वृद्ध महिला सुरक्षितपणे तिच्या कुटुंबीयांपर्यंत पोहोचू शकली असून नागरिकांकडून पोलीसांच्या या कार्याचे कौतुक होत आहे.

# सुबोध भावे अभिनीत 'श्री बाबा नीब करोरी महाराज'ला उदंड प्रतिसाद

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

२९ मे २०२६ रोजी प्रदर्शित झालेल्या 'श्री बाबा नीब करोरी महाराज' या चित्रपटाला प्रेक्षकांकडून अत्यंत उबदार प्रतिसाद मिळत आहे. प्रेक्षक या चित्रपटातील आध्यात्मिक खोली, भावस्पर्शी कथाकथन आणि प्रामाणिक अभिनयाचे विशेष कौतुक करत आहेत. आदरणीय नीम करोली बाबा यांचे जीवन, त्यांची शिकवण आणि त्यांचा वारसा अत्यंत भक्तीभावाने व अस्सलतेने मोठ्या पडद्यावर मांडल्याबद्दल सोशल मीडियावर प्रेक्षक या चित्रपटाची भरभरून प्रशंसा करत आहेत. नीम करोली बाबा यांची भूमिका साकारणारे अभिनेते सुबोध भावे यांच्यावर विशेष कौतुकाचा वर्षाव होत आहे; त्यांच्या शांत, तल्लीन आणि मनाचा ठाव घेणाऱ्या अभिनयाचे सर्वत्र कौतुक होत आहे. आपल्या दमदार अभिनयासाठी आणि चरित्रपटांमधील भूमिकांसाठी ओळखल्या जाणाऱ्या भावे यांनी या आध्यात्मिक व्यक्तिमत्त्वात केलेले रूपांतर प्रेक्षकांच्या मनाला खोलवर भिडले आहे.

# 'धुरंधर'साठी १००० हून अधिक व्हीएफएक्स शॉट्स

## फिल्मसीजीआयची राष्ट्रीय पुरस्कार सोहळ्यांमध्ये दमदार कामगिरी

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणेस्थित अग्रगण्य व्हिज्युअल इफेक्ट्स आणि ॲनिमेशन स्टुडिओ FilmCGI ने 'धुरंधर' आणि 'धुरंधर: द रिव्हेंज' या चित्रपटांच्या निर्मितीत महत्त्वपूर्ण योगदान देत १००० हून अधिक उच्च दर्जाचे व्हीएफएक्स शॉट्स साकारले आहेत. टीपीएन गोल्ड-प्रमाणित असलेल्या या स्टुडिओने भारतीय चित्रपटसृष्टीतील व्हिज्युअल कथाकथनाला नवी उंची दिली आहे. 'जिगरा', 'सीटीआरएल', 'क्वॉला', Stranger Things, Sacred Games, Pathaan, Kalki 2898 AD, Jubilee आणि ऑस्करसाठी नामांकन मिळालेल्या 'होमबाउंड' यांसारख्या प्रकल्पांमधील कामामुळे फिल्मसीजीआयने उद्योगात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. स्टुडिओच्या सर्जनशील आणि तांत्रिक



उत्कृष्टतेची दखल विविध पुरस्कार सोहळ्यांमध्येही घेण्यात आली आहे. कंपनीने Zee Cine Awards 2026 मध्ये 'बेस्ट व्हीएफएक्स' आणि Screen Awards 2026 मध्ये 'बेस्ट स्पेशल इफेक्ट्स' पुरस्कार पटकावले आहेत. तसेच प्रतिष्ठित VHAM Awards मध्येही त्यांच्या कामाचा गौरव करण्यात आला आहे. यापूर्वी 'जुबली' मालिकेसाठी फिल्मफेअर ओटीटी पुरस्कार आणि Delhi Safari या चित्रपटासाठी राष्ट्रीय पुरस्कारही स्टुडिओला मिळाले आहेत. 'धुरंधर' आणि 'धुरंधर: द रिव्हेंज'च्या निर्मितीदरम्यान फिल्मसीजीआयने B62 Studios च्या क्रिएटिव्ह टीमसोबत जवळून काम केले. व्हिज्युअल इफेक्ट्स प्रेक्षकांच्या लक्षात न येता कथानकाचा नैसर्गिक भाग वाटावेत, यावर विशेष भर देण्यात आला. भव्य दृश्यांपेक्षा वास्तववादी आणि कथेला पूरक परिणाम साधण्याचा प्रयत्न करण्यात आला. चित्रपटातील 'ल्यारी सेट' हे याचे उत्तम उदाहरण मानले जात आहे. या दृश्यामध्ये स्टुडिओने वर्ल्ड-बिल्डिंग, सेट ऑग्मेंटेशन आणि अत्याधुनिक कॉम्पोझिटिंग तंत्रज्ञानाचा वापर करून वातावरणाचा विस्तार केला. परिणामी पडद्यावर एक जिवंत, गजबजलेले आणि पूर्णपणे वास्तववादी जग उभे राहिले. प्रत्येक फ्रेम मूळ लाइव्ह-ॲक्शन दृश्यांशी अचूक जुळवून घेण्यासाठी बारकाईने काम करण्यात आले. भारतीय आणि जागतिक मनोरंजन क्षेत्रात व्हिज्युअल इफेक्ट्सची व्याप्ती सातत्याने वाढत असताना, फिल्मसीजीआय कथानकाला केंद्रस्थानी ठेवून नाविन्यपूर्ण आणि दर्जेदार व्हिज्युअल अनुभव साकारण्यावर भर देत आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि सर्जनशील दृष्टिकोनाच्या जोरावर कंपनी भारतीय सिनेमाच्या भविष्यातील व्हिज्युअल कथाकथनाला नवा आकार देत असल्याचे चित्र दिसत आहे.

# मोरेपेन लॅब्सचा Q4 नफा 69 टक्क्यांनी वाढला

**गुरुग्राम (दै. आरंभ पर्व)**

मोरेपेन लॅबोरेटरीज लिमिटेडने आर्थिक वर्ष 2025-26 च्या चौथ्या तिमाहीत (Q4 FY26) दमदार आर्थिक कामगिरी नोंदवली आहे. मागील आर्थिक वर्षाच्या तुलनेत कंपनीचा निव्वळ नफा 69 टक्क्यांनी वाढून 20 कोटी रुपयांवर पोहोचला असून एकूण महसूल 22 टक्क्यांनी वाढून 472 कोटी रुपये झाला आहे. निर्यात व्यवसायातील वाढ आणि मेडिकल डिव्हाइसेस व्यवसायातील विस्तारामुळे ही वाढ साध्य झाल्याचे कंपनीने स्पष्ट केले आहे. कंपनीच्या API (ॲक्टिव्ह फार्मास्युटिकल इंग्रेडिएंट) व्यवसायात चौथ्या तिमाहीत 17 टक्के वाढ झाली, तर मेडिकल डिव्हाइसेस व्यवसायात 31 टक्क्यांची वाढ झाली. संपूर्ण आर्थिक वर्ष FY2025-26 मध्ये कंपनीचा




स्टँडअलोन एकूण महसूल 1,700 कोटी रुपयांपेक्षा अधिक झाला असून तो मागील वर्षाच्या तुलनेत 8 टक्क्यांनी अधिक आहे. संचालक मंडळाने आर्थिक वर्ष 2026 साठी भागधारकांना 10 टक्के लाभांश देण्याची शिफारस केली आहे. कंपनीने सलग चौथ्यांदा यूएसएफडीए तपासणी कोणत्याही प्रतिकूल निरीक्षणाशिवाय (Nil 483 Observation) यशस्वीरित्या पूर्ण केल्याची माहिती दिली.

# शेतकऱ्यांची १३ लाखांची फसवणूक

## व्यापाऱ्यास अटक

**राजगुरूनगर (दै. आरंभ पर्व)**

खेड तालुक्यातील शेतकऱ्यांकडून शेतीमाल खरेदी करून पैसे देण्यास टाळाटाळ करत सुमारे १२ लाख ९७ हजार ८९६ रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी एका व्यापाऱ्यावर खेड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. खेड तालुक्यातील शिरोली, दावडी, खरपुडी खुर्द परिसरातील शेतकऱ्यांकडून बटाटा, वांगी, कोथिंबीर, चिक्कू आणि शेवगा, भुईमुग शेंगा असा शेतीमाल खरेदी करून सांगितलेल्या वेळेत पैसे न दिल्याने शेतकऱ्यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी संबंधित आरोपीला अटक केली असून पुढील तपास सुरू आहे. संशयीत आरोपी अरुण गुलाब जेडगुले (रा. वाणीमळा, पिंपळगाव तर्फे



नारायणगाव, ता. जुन्नर) असे त्याचे नाव आहे. संतोष लक्ष्मण मलघे (वय ४२, रा. खरपुडी खुर्द, ता. खेड) यांनी खेड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.

याप्रकरणी खेड पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, संशयीत आरोपी अरुण जेडगुले हा शेतकऱ्यांकडून शेतीमाल खरेदी करून पुढे व्यापाऱ्यांना विक्री करत असल्याचे सांगत होता. सुरुवातीला त्याने काही व्यवहारांमध्ये वेळेवर पैसे देऊन शेतकऱ्यांचा विश्वास संपादन केला. मलघे यांनी २१ मे २०२५ रोजी वांगी तसेच २८ जानेवारी २०२५ रोजी वांगी व कोथिंबीर विकल्यानंतर त्याचे पैसे वेळेत मिळाल्याने जेडगुलेवर विश्वास निर्माण झाला होता.

यानंतर त्याने संतोष मलघे यांच्यासह पंडित काळुराम गाडे, तानाजी रघुनाथ मलघे, उल्हास चिंधा काळे, संभाजी बबन मलघे (सर्व रा. खरपुडी खुर्द), शिवाजी विठ्ठल मांजरे (रा. पिंपळाची मांजरेवाडी), गणेश विठ्ठल जोशी, बाळासाहेब सिताराम जोशी (रा. खरपुडी बुद्रुक), तसेच काळुराम चिंगन गुंडाळ, रविंद्र यशवंत बोत्रे, विजय मारुती तनपुरे आणि गणपत तनपुरे (सर्व रा. दावडी) या शेतकऱ्यांकडून विविध प्रकारचा शेतीमाल उधारीवर घेतला. मात्र मालाची विक्री करूनही त्यांना पैसे दिले नाहीत. २८ जानेवारी २०२५ ते २२ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत शेतकऱ्यांकडून मोठ्या प्रमाणात शेतीमाल खरेदी केला होता. यामध्ये १५ टन, ४ क्विंटल बटाटा (प्रति किलो १६ रुपये दराने) सुमारे २ लाख ४६ हजार ४०० रुपये, ३ टन ८१ किलो वांगी (प्रति किलो २५ रुपये दराने) ७७ हजार रुपये, ६१० किलो चिक्कू (प्रति किलो ६० रुपये दराने) ३६ हजार ६०० रुपये, १,४०० जुड्या कोथिंबीर (प्रति जुडी १० रुपये दराने) १४ हजार रुपये, तसेच ११० किलो शेवगा शेंगा (प्रति किलो ५० रुपये दराने) ५ हजार ५०० रुपये किमतीचा माल खरेदी करण्यात आला होता. सर्व शेतकऱ्यांच्या शेतमालासह एकूण फसवणुकीची रक्कम १२ लाख ९७ हजार ८९६ रुपये इतकी असल्याचे तपासात समोर आले आहे.

# दत्त मंदिराचा वर्धापनदिन साजरा

**राजगुरूनगर-किरण खुडे (दै. आरंभ पर्व)**

राजगुरूनगर येथील दत्त विश्वस्त मंडळाच्या दत्त मंदिराचा वर्धापनदिन उत्साहात व भक्तीभावपुर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. अधिक मास, गुरुवार आणि प्रदोष या दुर्मिळ व पवित्र योगाचे औचित्य साधत या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. श्री पवमान पंचसूक्त पठण व अभिषेक सोहळा अत्यंत भक्तिमय, मंगलमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. संपूर्ण परिसर मंत्रोच्चारांनी आणि दत्तनामाच्या गजराने भारावून गेला होता. श्रद्धा, भक्ती आणि अध्यात्माचा सुंदर संगम अनुभवण्यासाठी मोठ्या संख्येने दत्तभक्त उपस्थित होते. या धार्मिक



सोहळ्याचे यजमान म्हणून अविनाश नाणेकर व प्रभाकर जाधव यांनी श्रद्धाभावाने विधिवत पूजा-अर्चा केली. शास्त्रोक्त पद्धतीने पार पडलेल्या या पूजाविधीत पौराहित्याची जबाबदारी वसंतराव खेडकर, अरविंद जोशी आणि गणेश खेडकर यांनी पार पाडली. त्यांच्या मंत्रमुग्ध करणाऱ्या वेदघोष आणि पवमान पंचसूक्ताच्या पठणामुळे संपूर्ण वातावरण अधिकच पावन आणि आध्यात्मिक झाले होते.

यावेळी श्री दत्त विश्वस्त मंडळाचे कार्याध्यक्ष रवींद्र जोशी, उपाध्यक्ष बाबा साळुंखे, अण्णा साळुंखे, सचिव नथुराम तनपुरे, खजिनदार हनुमंत सैद यांच्यासह भीमाशंकर तारू, संजय गवळी, मंदार पिसाळ, कमल पिसाळ, श्रीमती आमडेकर, कल्पना गवळी, रामभाऊ सैद, लक्ष्मण कहाणे, नारायण जाधव, माणिक तनपुरे, वेदांत मेटे, सार्थक कडधेकर, सुनिल नाईकडे, नूतन जाधव, चंद्रकला नाणेकर आदी दत्तभक्त उपस्थित होते.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.